# अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

---

**-:प्रेस नोट:-** **दिनांक २२/०५/२०२६.**

**‘चरस’ या अंमली पदार्थासह एका इसमास गजाआड केलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **कक्ष** | :- | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई. |
| **गु.र.क्र. व कलम** | :- | ५२/२०२६ कलम ८ (क) सह २०(क) एन. डी. पी. एस. ॲक्ट- १९८५<br>(टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई गु र क्र २८२/२०२६ कलम ८ (क) सह २०(क) एन. डी. पी. एस. ॲक्ट- १९८५ ) |
| **गुन्हा घडला दिनांक** | :- | दिनांक २१/०५/२०२६ रोजी १६.५५ वाजता ते १९:१० वाजता चे दरम्यान |
| **गुन्हा दाखल दिनांक** | :- | दिनांक २१/०५/२०२६ रोजी २०.५६ वाजता |
| **जप्त मुद्देमाल व मुल्य** | :- | कि.अं.रू. ३,८८,६०,०००/- मुल्याचा मुल्याचा ३ किलो ८८६ ग्रॅम वजनाचा ‘चरस’ हा अंमली पदार्थ |

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट चे पथक मुंबई शहरातील अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा शोध घेत असताना पथकास लोकमान्य टिळक टर्मिनस फ्लायव्होअरच्या खाली, रेल व्हिव सी एच एस रोड, नवीन टिळकनगर रेल व्हिव कौ. हौ. सो. गेट समोर, टिळकनगर, चेंबुर, मुंबई या ठिकाणी एका इसमाच्या हालचाली संशयास्पद दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचेकडे ३,८८,६०,०००/- मुल्याचा मुल्याचा ३ किलो ८८६ ग्रॅम वजनाचा **‘चरस’** हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने सदर इसमाविरूध्द एनडीपीएस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आली.

अशा प्रकारे ‘अंमली पदार्थमुक्त समाज’ बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई पोलीस दल सतत प्रयत्नशील आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष श्री. सुधीर हिरडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक संतोष साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली स पो नि किरण वाघ व पोलीस पथक यांनी पार पाडली असून गुन्ह्याचा पुढील तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स पो नि किरण वाघ हे करीत आहेत.

--------------------//------------------